# महाराष्ट्र विद्युत  नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (स्थायी कायदे सल्लागारः नेमणूकीच्या शर्ती व अटी) विनियम, २००४

**विद्युत अधिनियम, २००३**

क्र. मविनिआ/लिगल/१३१/२००४/२२२४ - विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १८१ (झेड पी) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, स्थायी कायदे सल्लागाराच्या नेमणुकी संबंधीच्या शर्ती व अटी पुढील प्रमाणे देत आहे. या विनियमात अन्य रीतीने दर्शविल्या व्यतिरिक्त, हे विनियम, 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (स्थायी कायदे सल्लागारः नेमणूकीच्या शर्ती व अटी) विनियम २०००' च्या जागी लागू असतील.

**१. संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ**

(i) या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (स्थायी कायदे सल्लागारः नेमणुकीच्या शर्ती व अटी ) विनियम, २००४ असे म्हटले जाईल.

(ii) हे विनियम, शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून अमलांत येतील.

(iii) हे विनियम, या विनियमाच्या विनियम ३ अन्वये नेमल्या गेलेल्या स्थायी कायदे सल्लागारासंबंधी लागू होतील.

**२. व्याख्या**

(१) या विनियमात, संदर्भानुसार  वेगळा अर्थ अपेक्षित नसल्यास: -

- (i) "अधिनियम"म्हणजे, विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा क्र.३६);
- (ii) "अधिवक्ता" म्हणजे, ॲडव्होकेट्स  ॲक्ट, १९६१ मधील तरतुदीनुसार कोणत्याही अधिकृत यादीत नाव असलेला  अधिवक्ता;
- (iii) "आयोग" म्हणजे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ;
- (iv) "स्थायी कायदे सल्लागार"म्हणजे, विनियम ३ अन्वये आयोगाने नेमणूक केलेला व आयोगाच्या सेवेत नसलेला अधिवक्ता.

(२) या विनियमात असलेल्या व वर व्याख्या न दिलेल्या परंतु अधिनियमात असलेल्या शब्द अथवा शब्दसमुच्चयांचा अर्थ अधिनियमात स्पष्ट केल्याप्रमाणे असेल.

**३. नेमणूक व समाप्ति**

(१) आयोग पुढील प्रमाणे नेमणूक करील:-

(i) उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील कामांसाठी स्थायी कायदे सल्लागार म्हणून वकील मंडळात (बार) कमीतकमी २० वर्षांचा लौकिक असलेला अधिवक्ता.

(ii) कोणत्याही फौजदारी न्यायालयाच्या कामांसाठी स्थायी कायदे सल्लागर म्हणून किमान १५ वर्षे लौकिक असलेला अधिवक्ता.

(iii) कोणताही ट्रायब्युनल, मंच किंवा सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय सोडून इतर कोणतेही न्यायालय, यातील कामांसाठी स्थायी कायदे सल्लागार म्हणून वकील मंडळात (बार) किमान ५ वर्षांचा लौकिक असलेला अधिवक्ता.

मात्र, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय किंवा इतर कुठलेही न्यायालय, ट्रायब्युनल किंवा मंचमधील, विशिष्ट प्रकरणासाठी त्या प्रकरणाचा प्रकार व जरुरीनुसार, आयोग अशा प्रकरणाचा विशेष अभ्यास असलेल्या दुसऱ्या कोणत्याही अधिवक्त्याची नेमणूक करु शकेल.

या शिवाय एखाद्या विशिष्ट कामासाठी केवळ विचार विनिमयासाठी देखील आयोग एखादा अधिवक्ता नेमू शकेल.

(२) कोणत्याही न्यायालयात, ट्रायब्युनल अथवा मंच मध्ये, आयोग एकापेक्षा अधिक अभिवक्त्यांची नेमणूक करु शकेल.

(३) नेमणूक करावयाच्या स्थायी कायदे सल्लागारांची संख्या, आयोग कामांच्या प्रमाणानुसार ठरवील.

(४) स्थायी कायदे सल्लागाराच्या सेवाकालाची समाप्ति, उभयपक्षी तीन महिन्यांच्या सूचनेने करता येईल.

**४. वरिष्ठ सल्लागाराची नेमणूक**

आयोग, तसे वाटल्यास, किंवा स्थायी कायदे सल्लागाराच्या सल्यानुसार, सर्वोच्च न्यायालय,उच्च न्यायालय, ट्रायब्युनल, किंवा मंच समोरील प्रकरणांसाठी, मोबदला ठरवून, एखाद्या सल्लागाराला कामावर ठेवू शकेल.

**५. कर्तव्ये**

स्थायी कायदे सल्लागाराची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :-

(१) आयोगाला व त्यातील कार्यकारी वरिष्ठांना, आयोगाने संदर्भ केलेल्या बाबतीत, कायदेशीर परिणाम असलेल्या बाबी यासंबंधी सल्ला व मत देणे.

(२) आयोगाने किंवा त्यातील कार्यकारी वरिष्ठांनी संदर्भ केलेल्या, करारपत्रे, संविदा आणि कायदेविषयक व / आणि नियामक स्वरुपाचे दस्तएवज बनविणे व तपासणे.

(३) आयोगाच्या वतीने, शपथपत्रे, प्रति शपथपत्रे, याचिका, अपील्स, प्रकरणांची टिप्पणी, आणि कायदेशीर प्रकरणाशी संबंधित असे इतर सर्व दस्तऐवज तयार करणे.

(४) आयोग हाच एक पक्षकार असलेल्या किंवा, त्याचे हितसंबंध असलेल्या, प्रकरण संबंधात, आयोगाने संदर्भ केलेल्या सर्व प्रकरणात किंवा प्रकरण गटात, सर्वोच्च व उच्च न्यायालय किंवा इतर कुठले ही न्यायालय किंवा ट्रायब्युनल किंवा मंचासमोर, आयोगाच्या वतीने हजर राहणे.

(५) आयोगाने त्याच्यावर सोपविलेल्या प्रकरण संबंधात, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय किंवा इतर कुठले ही न्यायालय किंवा ट्रायब्युनल किंवा मंच यांच्यापुढे प्रत्यक्ष हजर राहणे.

मात्र, अकल्पनीय व आकस्मिक अशा घटना घडल्यास, त्यावेळी, आयोगाच्या पूर्व-परवानगीने, स्थायी कायदे सल्लागार एखादे प्रकरण किंवा प्रकरणे इतर कोणत्याही अधिवक्त्यास सोपवू शकतो.

(६) आयोगाने वेळोवेळी सोपविलेले कायदेविषयक आणि /किंवा नियामक प्रकारची इतर कामे करणे.

## ६. आयोगाच्या हितसंबंधांना मारक अशा बाबतीत स्थायी कायदे सल्लागाराने प्रतिनिधित्त्व न करणे

स्थायी कायदे सल्लागार कोणत्याही प्रकरणात आयोगाविरुध्द उभा राहणार नाही. तसेच कोणत्याही बाबतीत आयोगाच्या हितसंबंधांना मारक ठरेल अशा प्रकारचे मत किंवा सल्ला इतरांना देणार नाही.

## ७. मानधन

कोणत्याही न्यायालय, ट्रायब्युनल, अथवा मंचमध्ये आयोगाला एकापेक्षा अधिक स्थायी कायदे सल्लागार नेमण्याची आवश्यकता भासल्यास, आयोग, अशा स्थायी कायदे सल्लागारांमधील वरिष्ठाला, प्रमुख स्थायी कायदे सल्लागार म्हणून नामोनिर्देशित करील आणि या विनियमाच्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे, असा प्रमुख स्थायी कायदे सल्लागाराला त्याने केलेल्या कामांसाठी दरमहा मानधन मिळविण्याचा हक्क असेल.

मात्र, एखाद्या प्रकरणात, त्या प्रकरणाचा प्रकार, प्रमुख स्थायी कायदे सल्लागाराने त्यावर घेतलेली मेहनत व वेळ तसेच लिखित स्वरुपात दिलेली कारणे विचारात घेऊन, आयोग प्रमुख स्थायी कायदे सल्लागाराला परिशिष्टात दिलेल्या मानधनाच्या ठरीव रकमेपेक्षा अधिक रक्कम मानधन म्हणून देण्यास मान्यता देऊ शकेल.

## ८. शुल्क

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र लॉ ऑफिसर्स (ॲपॉइंटमेंट,कंडिशन्स ऑफ सर्व्हिस,रेम्युनरेशन) रुल्स, १९८४ अन्वये उच्च न्यायालयातील ए-पॅनल अधिवक्ता करिता लागू असलेले शुल्क स्थायी कायदे सल्लागाराला देण्यात येईल आणि या विनियमामधील, विनियम ७ अनुसार, वरिष्ठ स्थायी कायदे सल्लागाराला त्याच्या मानधना व्यतिरिक्त असे शुल्कही दिले जाईल.

## ९. काही बाबतीत अधिक किंवा कमी शुल्क देण्याबाबत

एखाद्या बाबतीत,प्रकरणाचा प्रकार, व स्थायी कायदे सल्लागाराने घेतलेली मेहनत व वेळ यांच्या प्रमाणात,आयोग,ठरलेल्या शुल्कापेक्षा अधिक किंवा कमी शुल्क देण्याचा आदेश देऊ शकते.

## १०. समाप्तीमुळे प्रलंबित प्रकरणात वाजवी शुल्क प्रदान

पुढील पैकी कोणत्याही कारणांमुळे स्थायी कायदे सल्लागाराची नियुक्ति समाप्त झाली :-

(१) राजीनामा दिल्यामुळे ;

(२) आयोगाने एखाद्या प्रकरणात पुढे न जाण्याचे ठरविल्यास;

(३) स्थायी कायदे सल्लागाराची मुदत संपल्यास;

(४) आयोगाने कोणत्याही कारणांमुळे स्थायी कायदे सल्लागाराची सेवा समाप्त केल्यास,

तर, स्थायी कायदे सल्लागार हाताळत असलेल्या व सल्लागाराच्या सेवा समाप्तीचे वेळी प्रलंबित प्रकरणात, त्याने त्या किंवा इतर प्रकरणात, त्याच्या सेवासमाप्तीच्या तारखेपर्यंत केलेल्या कामाच्या प्रमाणानुसार,आयोग, आयोगाला वाजवी वाटेल असे शुल्क ठरविल.

## ११. आयोगाच्या अंगभूत अधिकाराचे जतन

विनियमांमध्ये दिलेल्या कार्यपद्धतीशी विसंगत असलेली कार्यपद्धत अवलंबिवणे आवश्यक असल्याचे आयोगाने ठरविल्यास, तसेच लिखित स्वरुपात नोंद केल्या गेलेल्या कारणांनी,तसेच काही बाबतीत निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थीतीत, या विनियमामधील कोणतीही बाब, आयोगाला, विनियमात असलेल्या तरतुदीपेक्षा वेगळी कार्यवाही करण्यास रोखू शकणार नाही.

## १२. दुरुस्ती करण्याचा साधारण अधिकार

ज्याकरिता ही विनियम बनवली गेली ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी,आयोग, कोणत्याही वेळी व याला योग्य वाटेल त्याप्रमाणे या विनियमामधील तरतुदी दुरुस्त करु शकते.

## १३. अडचणी दूर करण्याचा अधिकार

या विनियमांमधील तरतुदींच्या अंमलबजावणीत काही अडचणी निर्माण झाल्यास,त्या दूर करण्यासाठी, आयोग, सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाने परंतु अधिनियमाच्या तरतुदींना अ-सुसंगत नसलेल्या कोणतीही कार्यवाही करू शकेल.

## <u>परिशिष्ट</u>

**(विनियम ७ खाली)**

| क्रमांक | प्रमुख स्थायी कायदे सल्लागाराला देय | दर |
|---|---|---|
| १ | मोबदला (रि्टेनर स्वरुपात मानधन) | रु. ३००० दरमहा |
| २ | टपालखर्च, फॅक्स इत्यादी पत्र व्यवहार खर्च | रु. १००० दरमहा |

**मुंबई,**
**दिनांक: ३ डिसेंबर, २००४**

**ए. एम. खान,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**